-१३३- ४७५

३३

एका वर्ग-एक पदावरून दुस-या
वर्ग-एक पदावर पदोन्नती
झाल्यानंतर वेतननिश्चिती
करण्याबाबत - स्पष्टीकरण.

pay

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक वेतन १०८६/सीआर १६०/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मार्च १९८६.

शासन निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १०८२/सीआर ११००[२], दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ च्या संदर्भात अधिदान व लेखाधिकारी यांनी त्यांच्या क्रमांक अ.ले./टीएम/प-३८[३]/६३९, दिनांक ३१ डिसेंबर १९८५ च्या पत्रात असा मुद्दा उपस्थित केला आहे की, रु.१,५००/- पर्यन्त आरंभ होणा-या वेतनश्रेणीत रु.१,५००-१९२५ या वेतनश्रेणीचा समावेश होतो किंवा नाही. कारण रु.१,५००/- पर्यन्त म्हणजे रु.१,४९९-९९ असा अर्थ घेतला जातो. त्याबाबत असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे की, या वेतननिश्चितीचा फायदा रु.१,५००/- हून अधिक आरंभ वेतन असणा-या वेतनश्रेणीत पदोन्नती झालेल्यांना देय नाही म्हणजेच उदा. रु.१,५००-१,९२५ या वेतनश्रेणीतील पदोन्नतीला फायदा मिळेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मधुकर आरोळे,
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रति

543

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,